क्र.अमाशा १९७०(१)२६३२६-क
पुणे १, १८-८-७१

प्रति
शिक्षण उप संचालक,
पुणे विभाग, पुणे १०

विषय : कर्नाटक हायस्कूल, पुणे ४ मध्ये वि. पाचवी ते सातवीचे इंग्रजी माध्यमाचे वर्ग माध्यमिक शाळेस जोडण्यास परवानगी.

संदर्भ : आपले पृष्ठांकन क्र.जेम १(पीडी)दीआर दि. ११-२-७०

संदर्भाधीन प्रकरणी दि. १८-४-७१ ला शासनाने आदेश दिले असून कर्नाटक हायस्कूल, पुणे ४ मध्ये इंग्रजी माध्यमाचे इ. पाचवी ते सातवीचे, वर्ग विना अनुदान पद्धतीवर जून १९७१ पासून नेहमीच्या अटींवर सुरू करण्यास परवानगी दिली आहे.

शिक्षण संचालक,

शिक्षण अधिकारी जि.प. पुणे ११
मुख्याध्यापक, कर्नाटक हायस्कूल, पुणे ४
यांना आवश्यक कार्यवाहीसाठी प्रत अग्रेषित.

PRINCIPAL
SECONDARY SECTION
DR. KALMADI SHAMRAO HIGH SCHOOL
GANESH NAGAR, PUNE-411038.

PRINCIPAL
Dr. Kalmadi Shamrao High School
English Medium Secondary Sec.,
Ganesh Nagar, Pune - 411 038.

जा. क्र. माध्य-३[१४]/इ. ८वी, ९वी/पुणे/पु...
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे. १. यांचे कार्यालय.
दिनांक : 11 MAR 1998

प्रति,
शिक्षण अधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणे

विषय : इ. ८वी सह इ. ९वीच्या वर्गास परवानगी देणेबाबत.
कन्नड संघ, पुणे ४.

संदर्भ : शासन पत्र क्र. एसएसएन-१०९७/७८०७/माशि-१
दिनांक : ८.१०.९७

कन्नड संघ, पुणे ४ या संस्थेस जून ९६ पासून गणेशनगर, पुणे या ठिकाणी इंग्रजी माध्यमाची माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन क्र. एसएसएन-१०९७/७२९०/[१]/माशि-१ दिनांक : २६.३.९७ अन्वये शासनाने परवानगी दिलेले आहे.

याबाबत संस्थेने केलेली विनंती विचारात घेऊन तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून सदर संस्थेने १९९६.९७ या शैक्षणिक वर्षापासून इ. ८वी सह इ. ९वी या वर्ग कायमविनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास संदर्भीय आदेशान्वये शासनाने परवानगी दिलेली आहे.

नियमानुसार नैसर्गिक वाढीने १९९७.९८ या शैक्षणिक वर्षी इ. १०वीचा वर्ग सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

याबाबत आवश्यकती पुढील कार्यवाही तात्काळ करावी.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १.

प्रत: माहितीसाठ
सचिव
कन्नड संघ,
गणेशनगर, पुणे ४.

PRINCIPAL
SECONDARY SECTION
DR. KALMADI SHAMRAO HIGH SCHOOL
GANESH NAGAR, PUNE-411038.

जिल्हा परिषद पुणे. [illegible]
शिक्षण/माध्य/ड-४/प्रथम मान्यता/९७-९८
पुणे दि. १२/१२/९७.

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
डॉ. कलमाडी शामराव हायस्कूल. सि.डि. स्कूल, गणेशनगर, पुणे ४.

विषय :- इ. १० वी वर्गाला प्रथम मान्यता सन ९७-९८.

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कडील पत्र क्रं. माध्य ३/प्रथम मान्यता/पुवि/९७-९८. दि. १०/१२/९७.

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपल्या डॉ. कलमाडी शामराव हायस्कूल, गणेशनगर, मराठी/इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १० वी च्या वर्गास खालील अटींची पूर्तता करण्याच्या अटींवर सन १९९७ - ९८ च्या शैक्षणिक वर्षापासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१) संस्थेने मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी.
२) मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३) स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा साहित्य उपलब्ध करून द्यावे.
४) स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून ग्रंथाची भर घालावी.
५) विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर उपलब्ध करावे.
६) पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करून द्यावा.
७) शैक्षणिक, कार्यानुभव, व क्रीडा साहित्य उपलब्ध करून द्यावे.
८) शैक्षणिक साहित्याचा अध्यापनात वापर असावा.
९) स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करून द्यावी.
१०) वाढीव फीचे दर मा. शि. संचालक, महरा. पुणे यांचेकडून मंजूर करून [illegible]
११) माध्यमिक शाळा संहितेनुसार शालेय रेकॉर्ड असावे.
१२) कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
१३) शिक्षकांचा भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१४) विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करून घेण्यात यावी.
१५) अभ्यासेतर कार्यक्रम, विविध स्पर्धा व परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.
कर्मचाऱ्यांची सेवानोंद पुस्तके ठेवावीत.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे करिता

PRINCIPAL
SECONDARY SECTION
DR. KALMADI SHAMARAO HIGH SCHOOL
GANESH NAGAR, PUNE-411038.

PRINCIPAL
SECONDARY SECTION
DR. KALMADI SHAMRAO HIGH SCHOOL
GANESH NAGAR, PUNE-411038

कायम विनाअनुदान तत्वावर
इंग्रजी माध्यम

(1)

क्र. उमाशि-१/पुवि/वर्गमान्यता/आदेश/९८/९९
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक:- 9 MAR 1999

प्रति,
प्राचार्य/~~मुख्याध्यापक~~.
डॉ. शामराव कलमाडी विद्यालय व ज्यु. कॉलेज, गणेशनगर, एरंडवणे पुणे ४

विषय:- सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षी उच्च माध्यमिक इयत्ता ११ वी या (प्रथम वर्ष) नवीन/~~जादा~~ वर्ग मंजूर करण्याबाबत...

संदर्भ:- १. शासन पत्र क्र. एच.एस.सी/१०९८/२९९९/९८ उमाशि-१ दि. ३/१२/९८
२. मा. शिक्षण संचालक यांचे प.क्र. एच एस सी/१०९८/९८-९९/१४९४०/१२ एफ दि. २९/१२/९८

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय आदेशानुसार कळविण्यात येते की, सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ११ वी चे (प्रथम) वर्ष खालील नवीन/~~जादा~~ वर्गांना कायम विनाअनुदान तत्वावर खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

| इयत्ता | शाखा | | | | एकूण तुकड्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | | |
| इ. ११ वी प्रथम वर्ष | — | १ प्रथम इंग्रजी माध्यम | — | — | १ | कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता |
| इ. १२ वी द्वितीय वर्ष | — | — | — | — | — | — |
| एकूण | — | — | — | — | १ | — |

अटी-

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे आहे. तसेच ज्या माध्यमिक शाळेला **जोडून** उच्च माध्यमिक विभागाच्या वर्गात प्रवेश द्यावयाचा आहे अशी माध्यमिक शाळा मान्यता प्राप्त आहे.

२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

..२..

PRINCIPAL
DR. KALMADI SHAMARAO

५] ही परवानगी शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एचएससी/१००६/(१९/२...) दिनांक ६-५-०६ व त्यानंतर देण्यात येणाऱ्या विहित केलेल्या अटींच्या पूर्ततेवर अवलंबून राहणारी इमारत, शाळा खोल्यांचा, खोल्या व इतर भौतिक सुविधा, शैक्षणिक अर्हता धारण करणारे प्रशिक्षित शिक्षक, शैक्षणिक साहित्य, विज्ञान साहित्यासह प्रयोगशाळा ... या पूर्तता करणे या अटींवर परवानगी देण्यात येत आहे. वर्ग सुरु केल्यानंतर पडताळणी व सरासरी ... करावी.

६] प्रथम नवीन वर्ग उघडण्यास अनुज्ञेय संस्थेत/क.म.वि. ... निर्धारित केलेले रु. ५०००/- भरण्याच्या अटीवर परवानगी देण्यात येत आहे. तदर्थ शुल्क भरले नसल्यास ते त्वरित भरावे व त्या चलनाची सत्य प्रत या कार्यालयात सादर करावी.

७] स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालयास परवानगी देता येणार नाही अशा संस्थेने स्वतंत्रपणे इ. ११वी/१२वी चे वर्ग सुरु केल्यास ते त्वरित बंद करावेत.

८] चालू शैक्षणिक वर्षी वर्ग सुरु केलेला नसल्यास या मान्यता पत्राच्या आधारे पुढील वर्षी वर्ग सुरु करता येणार नाही त्यासाठी पुनश्च: शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेमार्फत प्रस्ताव पाठवावा.

९] या मान्यता आदेशान्वये सदर तुकडीत विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. तसेच वर्ग ~~काहे~~ किंवा नाही या बाबतचा अहवाल प्राचार्यांनी/मुख्याध्यापकांनी या कार्यालयास विनाविलंब सादर करावा.

१०] पुढील शैक्षणिक वर्षी इ.१२ वीचा नैसर्गिक वाढीचा वर्ग सुरु करण्यापूर्वी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्याकडे प्राचार्यांनी/मुख्याध्यापकांनी लेखी सूचना प्रस्ताव सादर करावा. शासनाच्या परवानगी शिवाय वर्ग सुरु केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य/मुख्याध्यापक यांचेवर राहील याची नोंद घ्यावी.

स्थळप्रतीवर मा. शि.उ. यांची सही आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ यांचे करिता

प्रत-

१] मा. शिक्षण सचिव,
शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय,
विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर.

२] मा. शिक्षण संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे
यांना संदर्भिय पत्रानुसार माहितीसाठी सविनय सादर.

३] शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
पुणे/अहमदनगर/रायगड/सोलापूर यांना योग्य त्या
माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.

PRINCIPAL
SECONDARY SECTION
DR. KALMADI SHAMRAO HIGH SCHOOL
GANESH NAGAR, PUNE-411038.

५७८७१८५४

(3)

**कायम विनाअनुदान तत्वावर**

जाक्र उमाशि-१/पु.वि./जा.अ.वर्ग/मान्यता/काविअ
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक :

Commerce

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,

श्री आमराव कलमाडी विद्यालय
व कनिष्ठ कॉलेज गणेशनगर पुणे

विषय : अनुदानित/अंशतः अनुदानित/विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेस / कनिष्ठ महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २००२-०३ करिता जादा/अतिरिक्त तुकड्या मंजूरीबाबत. . .

संदर्भ : १. शासन पत्र क्र. एचएससी-१७०३/(१८/०३)/उमाशि-१, दि. १२.२.२००३
२. संचालनालयाचे जा पत्र क्र. एचएससी/६०८०९/०२-०३/जादा/अतिरिक्त तुकड्या/मं.आ./१२ एच.एस., दि. २०.२.२००३

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, आपल्या माध्यमिक शाळेस/उच्च माध्यमिक शाळेस/कनिष्ठ महाविद्यालयास शासन निर्णय दिनांक २१.११.२००० मधील आणि त्याशिवाय खालील अटींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २००२-२००३ करिता **कायम विना अनुदान तत्वावर** खाली नमूद केलेली/केलेल्या अतिरिक्त तुकडी/तुकडया मंजूर करण्यात येत आहे/आहेत.

| अ. क्र. | माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव व पत्ता | वर्ग व शाखा | तुकडी क्रमांक | कायम विनाअनुदानित तत्वावर वर्ग मंजूरीचे वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १ | श्री आमराव कलमाडी विद्यालय व कनिष्ठ कॉलेज पुणे | इयत्ता ११ वी विज्ञान वाणिज्य | दुसरा प्रथम | २००२-०३ | कायम विनाअनुदान तत्वावर वर्ग मान्यता |

**अटी व शर्ती**

१. जुलै/ऑगस्ट मधील पटपडताळणी नंतर मान्य केलेल्या पटावर वरील तुकडी मंजूर केलेली आहे.
२. मान्य पटापेक्षा कमी पट असल्यास/आढळल्यास सदर तुकडी नादेय राहील.
३. सदर तुकडीचा आदेश प्राप्त होताच तुकडी/तुकड्या सुरु असल्याचा अहवाल मुख्याध्यापकाने/प्राचार्याने शिक्षणाधिकारी/ शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे पाठवावा. अन्यथा सदर तुकडी चालू नाही असे गृहित धरुन ती अग्राह्य धरली जाईल. अशा अग्राह्य वर्ग/तुकडीस आवश्यकता भासल्यास सदर वर्ग/तुकडीस पुर्नजिवीतसाठी विहीत नमुन्यात शिक्षणाधिकारी माध्यमिक मार्फत प्रस्ताव या कार्यालयास सदर वर्ग/तुकडी सुरु केल्यानंतर एक महिन्याच्या आत सादर करावा.
४. सदर तुकडीवर नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचा-यांची संच मान्यता आणि वैयक्तीक मान्यता विषयक प्रस्ताव आदेश मिळाल्यापासून १० दिवसांचे आत विभागीय शिक्षण उपसंचालक कळवतील त्यातिकाणी शिबिरामध्ये दाखल करणे उच्च माध्यमिक शाळेवर बंधनकारक राहील.
५. पुढील शैक्षणिक वर्षी सदर मंजूर तुकडी अगर नैसर्गिक वाढीने चालू राहणा-या सदर वर्गाच्या तुकडीस निकषापेक्षा पट कमी झाल्यास ती तुकडी मुख्याध्यापकाने/प्राचार्यांनी तात्काळ बंद झाल्याचे शिक्षणाधिकारी/ शिक्षण उपसंचालक कार्यालयास कळवावे.
६. इयत्ता ११ वी चे उच्च माध्यमिकचे वर्ग माध्यमिक शाळांना जोडलेले असल्यास ८० विद्यार्थ्यांची एक तुकडी व वरिष्ठ महाविद्यालयास जोडलेले असल्यास १२० विद्यार्थ्यांची एक तुकडी समजण्यात येईल.

PRINCIPAL
SECONDARY SECTION
DR. KALMADI SHAMRAO HIGH SCHOOL
GANESH NAGAR, PUNE-411...

स्थळप्रती मा. शि. उ. सं. यांची स्वाक्षरी असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता

Arts 11th

(5)

# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्सनं.- ०२०- २६१२२२१७
ई मेल आय डीक्र.dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune.com

जा.क.शिउस/उमाशि-१/पुवि/जावनुमा-२०१९/ 2210३ दि. 15 MAR 2019

प्रति,
प्राचार्य,
डॉ.कलमाडी शामराव कनिष्ठ महाविद्यालय,एरंडवणे, पुणे.

**विषय ःसन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना इयत्ता ११ वी कला प्रथम अतिरिक्त शाखेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याबाबत.**

संदर्भ:- १.शासन निर्णय क.उमातू-२०१८/प्र.क.१३१/एसएम-५ दि.१२ ऑक्टोबर २०१८ च्या पत्रानुसार.
२.मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क.उच्च माध्यमिक-२४१/तुशा/२०१७/१२०४९ दि.०६.१२.२०१८ पत्र.

आपणास कळविण्यात येते की, संदर्भीय शासन आदेशान्वये सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून इ.११ वीची कला एक प्रथम अतिरिक्त शाखेस स्वयं अर्थसहाय्य तत्वावर खालील अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क | उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव | माध्यम | मंजूर केलेली शाखा/तुकडी | मंजूर वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.कलमाडी शामराव कनिष्ठ महाविद्यालय,एरंडवणे, पुणे | इंग्रजी | कला एक प्रथम | २०१८-१९ |

१.प्रस्तुत आदेशान्वये ज्या उच्च माध्यमिक शाळांना जादा तुकडया/अतिरिक्त शाखा मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्या शाळांमध्ये भौतिक व शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध असल्याची खात्री करावी.
२.सदर जादा तुकडी/ अतिरिक्त शाखा विहित निकषांप्रमाणे आवश्यक पटसंख्या असल्याची खात्री करावी.
३.पटसंख्येच्या निकषांप्रमाणे पात्र ठरलेल्या शाळांना स्वयं अर्थसहाय्य तत्वावर जादा तुकडी/ अतिरिक्त शाखांना मंजूर झाली अशा शाळांनी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीसाठी बायोमेट्रीक प्रणाली कार्यान्वीत करून विद्यार्थ्यांच्या दोन वेळ उपस्थितीच्या एक महिना कालावधीच्या अहवालासह आवश्यक प्रस्ताव शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे विभाग पुणे या कार्यालयाकडे सादर करावा.

MRaut
(मिनाक्षी राऊत)
प्र.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत माहितीसाठी सविनय सादर :-
१. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
३. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे-५
४. शिक्षणाधिकारी(माध्यमिक)जिल्हा परिषद,पुणे यांनी एक महिन्याच्या आत सदर शाळेची तपासणी करून अहवाल सादर करावा.

PRINCIPAL
SECONDARY SECTION
DR. KALMADI SHAMRAO HIGH SCHOOL
GANESH NAGAR, PUNE-411038.